| | |
|---|---|
| **MHLA**080009012022 | **विशेष दि.दा.क्र.१०८/२०२२**<br>**कांताबाई वि. कस्तुरबाई** |

## आदेश नि.क्र.१०

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल करणेस विलंब झाल्यामुळे सदर विलंब माफ करुन कैफीयत दाखल करणेस परवानगी मिळणेबाबतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर वादीतर्फे लेखी खुलासा मागविण्यात आला. वादींनी सदर अर्जावर त्यांचे लेखी म्हणणे दाखल करुन त्यांची हरकत नोंदवली आहे.

२. युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा खरेदीखत अपरिणामकारक असल्याचे घोषीत करुन रदद करणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. परंतु अनेक संधी देवून सुध्दा सदर प्रतिवादींनी वादीचे दावे अर्जास विहीत मुदतीत कैफीयत दाखल केली नाही. परंतु असे जरी असले तरी सदर प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन संधी देणे गरजेचे आहे. एकंदरीत सदर अर्जात नमुद केलेले कारण व कायदेशिर बाब विचारात घेता सदर प्रतिवादींना त्यांच्या बचावाची संधी देणे आवश्यक आहे. परंतु असे असले तरी प्रस्तुत दाव्यास म्हणणे दाखल करण्यास प्रतिवादीस विलंब झालेला आहे. त्यामुळे अशा परिस्थीतीत प्रतिवादीवर खर्च लादणे न्यायोचीत होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादी यांचा अर्ज नि.क्र.१० वादींना रक्कम रु.२००/– (अक्षरी रक्कम रुपये दोनशे) खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

(एम.एस.एम.वाय.रचभरे)

दि.२८/०८/२०२३

सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
उदगीर